**क्र. १६३ (२) /२०१९ / कक्ष-१४ ब** **दि. १० जुलै, २०२०**

**महाराष्ट्र वन सेवा (मुख्य) परीक्षा-२०१९**
**जाहीरात क्र. १२ / २०१९**
**घोषणा**

आयोगातर्फे महाराष्ट्र वन सेवा (मुख्य) परीक्षा- २०१९ या परीक्षेसंदर्भात मुलाखत कार्यक्रम दि. ४ ते २१ ऑगस्ट, २०२० या दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. मुख्य परीक्षेद्वारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांकडून प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचनेत अधिसूचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference) त्यांच्या प्रोफाईलमध्ये पाठविलेल्या नमुन्यात (Format) Online पध्दतीने मागविण्यात आले होते.

तथापि, दरम्यान राज्य सेवा (मुख्य) परीक्षा -२०१९ च्या एकूण ४२० पदांचा अंतिम निकाल दि. १९ जून, २०२० रोजी जाहीर करण्यात आला असून त्यामधून गट- ब पदावर निवड झालेले काही उमेदवार महाराष्ट्र वन सेवा (मुख्य) परीक्षा -२०१९ च्या मुलाखतीकरीता पात्र ठरले असल्याचे निदर्शनास आणण्यात आले आहे. तद्अनुषंगाने महाराष्ट्र वन सेवा (मुख्य) परीक्षा -२०१९ संदर्भात पदांविषयी पसंतीक्रम देण्याची लिंक पुन्हा उपलब्ध करुन देण्याबाबतची अभिवेदने / विनंती अर्ज उमेदवारांकडून आयोगास प्राप्त झालेली आहेत. ऑनलाईन पध्दतीने पदांचे पसंतीक्रम अपडेट करण्याची एक संधी आयोगातर्फे उपलब्ध करुन देण्यात येत असून ज्या उमेदवारांना आपले यापूर्वीचे पसंतीक्रम अपडेट करावयाचे असतील त्यांनी Online पध्दतीने Link Open झाल्यापासून **आठ दिवसांच्या आत म्हणजेच दि. १७ जुलै, २०२० पर्यंत अपडेट करावेत. तद्नंतर यासंदर्भात कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाहीं.**

केवळ ऑनलाईन पध्दतीने भरलेले पसंतीक्रम विचारात घेण्यात येतील. अन्यथा अधिसूचनेत ज्या क्रमाने पदांचा तपशिल दर्शविला आहे, त्याप्रमाणे पदांचा पसंतीक्रम गृहीत धरला जाईल. अन्य कोणत्याही प्रकारे पाठविलेला पसंतीक्रम ग्राहय धरला जाणार नाही व विहित कालावधीनंतर याबाबत कोणतीही निवेदने / पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही. याची संबंधित उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :- **१० जुलै, २०२०**
ठिकाण :- मुंबई

उप सचिच (परीक्षा - १)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,